# शहरीकरणाचे ग्रामीण जीवनावरील परिणाम : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक
अनुजा रामानंद पाटील
भूगोल विभाग
वसंतदादा पाटील कॉलेज ,
पाटोदा , जिल्हा बीड .

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधानदेश म्हणून ओळखला जातो. खऱ्याभारताचेदर्शन हे खेड्यातच होते हे गांधीजींचे म्हणणे कोठे तरी दूर झालेले दिसते. १९६०ते१९८०पर्यंत ग्रामीण प्रभुत्व होते. त्यानंतर१९८०नंतरच्या काळात शहरीकरणाचा वेग वाढलेला दिसून येतो . अनिश्चित पावसावरील अवलंबित्वा मुळे शेती उत्पादनात होणारी घट , कमाल जमीन धारणा कायदा ,विभक्त कुटुंब पद्धती ,शैक्षणिक सेवा ,वैद्यकीय सुविधा ,शहरातील जीवनाचे विशेष आकर्षण इत्यादी सर्व कारणा मुळे ग्रामीण भागातील लोक हे शहराकडे आकर्षित होऊ लागली . परिणामतःग्रामीण भागातील लोकसंख्या कमी होऊन शहरी भागातील लोकसंख्येचा फुगवटा वरचेवर वाढ लागला . त्यामुळे वाढत्या शहरीकरणाचा प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण जीवनावरती होऊ लागला .

भारतात कृषीच्या संदर्भात अनेक योजना राबविण्यात आल्या . परंतु यातील ऐकाही योजनेचा उद्देश हा शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा करणे हा नव्हता .त्यामुळे अलीकडील काळात कृषी क्षेत्रात नाराजी निर्माण होऊन लोकांचा कल हा शहरी भागाकडे वळलेला दिसून येतो . शहरी जीवनाच्या तुलनेत ग्रामीण जीवन खूप कष्टप्रधान असून त्याचा मोबदला हा शहरी जीवनाच्या तुलनेत कमी असलेला दिसून येतो . शहरात कमी वेळेत व कमी कामात जास्त मोबदला मिळतो. परंतु शेतात खूप कष्ट करून शेवटी ज्यावेळी मोबदला मिळतो त्यावेळी शेतकरी हा नाराजच होतो ,कारण कष्टाच्या व खर्चाच्या तुलनेत मिळणार मोबदला हा नगण्य असतो . त्यामुळे कृषीक्षेत्राचे नाराजीचे प्रमाण वाढून शहरीकरणाचे विशेष आकर्षण वाढत आहे . शहरी भागात मिळणाऱ्या सोयीसुविधा ,दळणवळणाची साधने ,शैक्षणिक ववैद्यकीय सेवासुविधा ग्रामीण जीवनाच्या तुलनेत शहरी जीवनात मोठ्या प्रमाणात मिळतात . शहरी भागाचे आकर्षण औद्योगिक सोयी , दळणवळण सोयी सुविधा ,शैक्षणिक स्तर इत्यादी कारणामुळे ग्रामीण भागातील लोक स्थलांतर करून शहराकडे येत असल्यामुळे शहरी भागात अनेक प्रमाणात समस्या निर्माण होत आहेत . शहरी भागात लोकसंख्या वाढल्यामुळे तेथील लोकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे . पूर्वीच्या तुलनेत आता शहरी भागातील लोकांचे प्रमाण वाढलेले आहे . पूर्वी ८०% लोक ग्रामीण भागात होते व शहरी भागात २०% लोक होते . परंतु अलीकडील काळात हे चित्र बदललेले दिसून येते . आता ५५% ग्रामीण व ४५% शहरी लोकसंख्येचं प्रमाण दिसून येत आहे. शहरांचा विचार करत असताना काही मोठी शहरे तर काही लहान शहरे असतात . मोठमोठ्या शहरात लोकसंख्येच्या स्थलांतराचे प्रमाणं मोठ्या प्रमाणात दिसून येते . ग्रामीण भागातील शिक्षणाच्या सुविधांच्या तुलनेत शहरी भागातील शैक्षणिक सुविधा हे ऐक आकर्षणाचे कारण आहे . शेतीच्या उत्पनाच्या अनिशिच्ततेपेक्षा नोकरीचे कमी का असेना पण उत्पन्न चांगले वाटू लागले त्याचा परिणाम म्हणून 'खेडी ओस पडू लागली तर शहरे सजू लागली '.

**उद्दिष्टे :**

१. लोकसंख्येच्या स्थलांतराचा परिणाम अभ्यासणे .
२. शहरी व ग्रामीण सोई सुविधांचा अभ्यास करणे .
३. ग्रामीण जीवनावरील शहरीकरणाचा परिणाम अभ्यासणे .

**विषय विवेचन :**

अलीकडील काळात शहरीकरणाचे वाढते प्रमाण याचा विचार केला तर ग्रामीण जीवनावरती याचा फार मोठा परिणाम झालेलादिसतो . शहरीकरणाचे विशेष आकर्षणामुळे शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे त्याच्या तुलनेत ग्रामीण भागातीललोकसंख्या हि हळूहळू कमी कमी होत आहे. ग्रामीण

भागातून शहरी भागात स्थलांतराचे प्रमाण वाढत गेले आहे यामुळेशहरी जीवनाचा ग्रामीण जीवनावरती सकारात्मक व नकारात्मक परिणाम झालेला आपणास खालील मुद्यांच्या आधारे सांगतायेईल .

**सकारात्मक परिणाम :**

**१. शिक्षण :** ग्रामीण भागात सुरवातीच्या तुलनेत अलीकडील काळात शिक्षणाच्या मोठ्या प्रमाणात सुविधा निर्माण होत आहेत . शहरीकरणाचा हा एक सकारात्मक बदल आहे . ज्याप्रमाणे शहरी भागातील मुलेमुली शाळा कॉलेज मध्ये जाऊन शिक्षण घेतात त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील शाळा कॉलेज मध्ये जाऊन शिक्षण घेत आहे . ग्रामीण भागात शाळांची संख्या देखील वाढत आहे . शहरी भागात अलीकडील काळात इंग्रजी माध्यमाचे विशेष आकर्षण वाढलेले आहे त्याचप्रमाणे ग्रामीण भागात देखील इंग्रजी माध्यमाचे आकर्षण वाढत आहे त्यामुळे ग्रामीण भागात देखील इंग्रजी माध्यमांच्या शाळांची निर्मिती होत आहे .

**२. आरोग्य :** शहरीकरणाचा आणखी एक परिणाम म्हणून आपणास आरोग्याच्या सुविधांचा विचार करावा लागेल . शहरीकरणामुळेग्रामीण भागात देखील आता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत . त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना कोणत्याही आजारावरती प्राथमिक उपचार लवकरात लवकर मिळत आहे.

**३. वाहतूक साधने :** ज्याप्रमाणे शहरात वाहतुकीच्या साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील लोक देखील मोठ्या प्रमाणात वाहतुकीच्या साधनांचा वापर करत आहेत. वाहतुकीची छोट्या व मोठ्या स्वरूपातील साधने आता ग्रामीण भागात देखील पाहवयास मिळतात .

**४. रस्ते बांधणी :** ग्रामीण भागातील सुरवातीच्या पाऊलवाटा जाऊन आता त्या जागी सिमेंटच्या पक्क्या रस्त्यानी जागा घेतली आहे .

**५. शौचालय - स्वछतागृहे :** शहरीकरणाचा एक चांगला परिणाम म्हणून आपणास शौचालय सांगता येतील. ग्रामीण भागात सुरवातीस उघड्यावरती जाणारे लोक हे आता शौचालयांचा वापर करत आहेत . स्त्रियांना सुरवातीला जो जो त्रास होयचा तो आता थांबला आहे .

**६. गृहरचनेतील बदल :** ग्रामीण भागातील गृह रचनेत रचनेत मोठा बदल होत आहे . ग्रामीण भागात देखील शहरी भागांसारखी सिमेंटची मजबूत घराची निर्मिती होत आहे . शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोक देखीलगृहसजावटीकडे विशेष लक्ष देत असलेली दिसून येत आहेत .

**७. रोजगार उपलभदत:** शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकांना शहरात रोजगार मिळत आहे .

**८. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :** शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोक देखील मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात करत आहेत .

**९. ' संथ 'जीवन 'गतीशील ' झाले :** ग्रामीण भागातील लोंकांचे जीवन हे संथ स्वरूपातील होते, परंतु अलीकडील काळात शहरीकरणाच्या परिणामामुळे आता ते जीवन गतीशील झाले आहे.

**नकारात्मक परिणाम :**

**१. स्थलान्तर :** शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागाकडे स्थलान्तराचे प्रमाण वाढले आहे . परिणामी ग्रामीण भाग ओस पडू लागले व शहरे सजू लागली .

**२. लोकसंख्या वाढ :** शहरीकरणामुळे शहरात लोकसंख्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे . परिणामी ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण कमी होत आहे .

**३. गृहनिर्माण समस्या :**शहरीकरणामुळे शहरात लोकसंख्येचे प्रमाण वाढत असल्यामुळे गृहनिर्माण समस्या निर्माण होत आहे . शहरात कमी जागेत जास्त घरांची निर्मिती करण्यात येत आहे . परिणामतः शहरात सिमेंटची जंगले निर्माण होत आहेत .

**४. अस्वच्छता :** वाढत्या लोकसंख्येमुळे शहरात अस्वच्छता याचे प्रमाण वाढत आहे . शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील अशिक्षित लोक देखील रोजगार मिळवण्यासाठी शहरात राहत आहेत परंतु शहरातील स्वछतेचे नियम ते पाळत नाहीत , परिणामी अस्वच्छता वाढत जाते .

**५. प्रदूषण :** शहरीकरणामुळे वनांचे प्रमाण कमी होऊन सिमेंटची जंगले वाढली . मोठमोठ्या औद्योगिक कारखान्यांची निर्मिती झाली त्यामुळे शहरात प्रदूषणाचे प्रमाण वाढत गेले . शहरात वेगवेगळ्या प्रदूषणाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे .

**६. सुरक्षित पिण्याचे पाणी :** शहरीकरणामुळे शहरात दूषित पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे . लोकसंख्या मोठ्या प्रमाणवर वाढत आहे , अस्वच्छता वाढत आहे , प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे त्यामुळे सुरक्षित पिण्याचे पाणी समस्या निर्माण झाली आहे .

**७. आरोग्य व शिक्षण :** वाढत्या लोकसंख्येमुळे शहरात

आरोग्याच्या व शिक्षणाच्या समस्या निर्माण होत आहेत . शहरात शाळांची संख्या भरमसाठ वाढत आहे परंतु शिक्षणाचा दर्जा मात्र खालावत चालला आहे . शहरात शिक्षणाचे व आरोग्याचे बाजारीकरण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे .

**८.शहरी सार्वजनिक वाहतूक :**शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे. या वाहतुकीच्या समस्येमुळे शहरात अपघाताचे प्रमाण वाढत आहे .

**९. पर्यावरण समस्या :** शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे . वनांचे प्रमाण कमी होऊन सिमेंटची जंगले वाडत आहेत . वेगवेगळ्या प्रदूषणामुळे पर्यावरण संतुलित राहत नाही . मोबाईल च्या वापरामुळे पशु पक्षी यांच्या संख्येत घट होत आहे .

**१०. झोपडपट्टींची समस्या :** वाढत्या लोकसंख्येमुळे शहरात झोपडपट्टींची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे . प्रत्येक लोकांना स्वतःची घरे निर्माण करणे शक्य नसते परिणामतः खूप लोक झोपड्या निर्माण करून राहू लागतात त्यामुळे झोपडपट्टींची समस्या निर्माण होते .

**११. बेरोजगारी :** शहरीकरणामुळे सर्वात मोठी समस्या बेरोजगारी हि निर्माण झाली आहे .

**१२. शहरी अपराध :** शहरात मोठ्या प्रमाणात अपराधाचे प्रमाण वाढत आहे . शहरातील वाढती लोकसंख्या , बेरोजगारी यांचे प्रमाण वाढत आहे त्यामुळे अपराधाचे प्रमाण वाढत आहे .

**१३. शेती कामासाठी मजूर तुटवडा :** वाढत्या शहरीकरणामुळे सर्वात मोठी समस्या ग्रामीण भागात शेती कामासाठी मजुरांचा तुटवडा निर्माण होत आहे परिणामतः शेती कामासाठी कोणीही लवकर तयार होत नाही .

**निष्कर्ष :**

वाढत्या शहरीकरणाच्या आकर्षणामुळे ग्रामीण जीवनावरती मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला दिसतो . भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता सुरवातीच्या काळात ग्रामीण भागातील प्राथमिक व्यवसाय शेती होता परंतु आता मात्र लोकांचा कल हा शेती हा दुय्यम झाला आहे . वरील सर्व विवेचनावरून आपणास असा निष्कर्ष काढता येईल कि , ग्रामीण जीवनावरती शहरीकरणाचा फार मोठा परिणाम झालेला आहे .

**उपाय :**

शहरीकरणामुळे ग्रामीण जीवनावरती झालेल्या परिणामांचा विचार करता त्या थांबवण्यासाठी आपणास काही उपाय करता येऊ शकतात ते खालीलप्रमाणे . . . .

१. लोकसंख्या नियंत्रित ठेवावी .
२. प्रदूषण नियंत्रित ठेवावे .
३. वृक्षतोड कमी करून वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणावर करावी .
४. जलनियोजन व जलव्यवस्थापण करावे .
५. रोजगारांची उपलबद्धता करून द्यावी .
६. शिक्षण व आरोग्याच्या दर्जेदार सुविधांची निर्मिती करावी .
७. गुन्हेगारीला आळा बसवावा .
८. वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे .

**समारोप :**

शहरीकरणाच्या परिणामांचा विचार करता आपल्याला काही सकारात्मक व काही नकारात्मक परिणाम दिसून येतात . आपण सर्वांनी मिळून जर काही उपायांचा अवलंब केला तर आपणास त्यावरती काहीतरी प्रमाणात आळा घालता येऊ शकेल .

**संदर्भ सूची :**

1. Das A.K. (2007)Urban Planning in India, Rawatpublication , Jaipur.
2.Gupta R.C. (1982), Planning and devolpment of towns , DDA, New Delhi.
3. Sidharthak,Mukharjees- Cities Urbanization , Kissalya publication Pvt. Ltd.New Delhi . 1997
४. सावंत प्रकाश -नागरी भूगोल , फडके प्रकाशन कोल्हापूर , १९९८